# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उदयान विभाग

डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन (नगरभवन) भाईंदर (प.) ता.जि.ठाणे - ४०१ १०१, दुरध्वनी - २८१८४५५३

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.मनपा/उदयान/ ८६ /२०२५-२६ दिनांक :-02/०५/२०२५

प्रती,
सिस्टम मॅनेजर
मिरा भाईंदर महानगरपालिका

**विषय :- जाहिर आवाहन प्रसिध्दी करणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात SUNDAY GARDEN या उपक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे, सदर जाहिर आवाहन महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.

**सोबत:- जाहिर आवाहन प्रत.**

(कल्पिता पिंपळे)
उप-आयुक्त (उद्यान)
मिरा भाईंदर महानगरपालिका

Scanned with CamScanner

मिरा भाईंदर महानगरपालिका
उदयान विभाग
डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन (नगरभवन) भाईंदर (प.) ता.जि.ठाणे - ४०१ १०१, दुरध्वनी – २८१८४५५३

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# // आवाहन //

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व नागरीकांना सुचित करण्यात येते कि, मिरा भाईंदर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक, श्री.राधाबिनोद अ.शर्मा यांच्या मार्गदर्शनानुसार SUNDAY GARDEN या उपक्रमाचे आयोजन मे-२०२५ मध्ये येणाऱ्या प्रत्येक रविवारी करण्यात येणार आहे. या उपक्रमाचे सामाजिक व सांस्कृतिक मुल्यांची जागृती करणे, नागरिकांचा सहभाग मिळविणे, नागरीकांचे मनोरंजन होणे ही उद्दीष्टे आहेत.

त्या दृष्टीने महानगरपालिकेतर्फे **ज्ञान ज्योती सावित्रीबाई ज्योतिबा फ़ूले उद्यान (आरक्षण क्र.२६९),कनकिया,मिरारोड(पु.) येथे दि.०४/०५/२०२५ रोजी सायंकाळी ०६:०० वाजता** कार्यक्रमाचा शुभारंभ मा.आयुक्त तथा प्रशासक श्री.राधाबिनोद अ.शर्मा यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. तसेच दि.११/०५/२०२५, दि.१८/०५/२०२५, व दि.२५/०५/२०२५ या कालावधीत येणा-या प्रत्येक रविवारी SUNDAY GARDEN हा उपक्रम खालील उद्यानांमध्ये राबविण्यात येणार आहे.

१) सालासार हनुमान उद्यान, भाईंदर (प.)
२) जेसल पार्क चौपाटी, भाईंदर (पु.)
३) ज्ञान ज्योती सावित्रीबाई ज्योतिबा फ़ूले उद्यान (आरक्षण क्र.२६९), कनकिया मिरारोड (पु.)
४) आरक्षण क्र 242 उद्यान,रामदेव पार्क, मिरारोड (पु.)

उपरोक्त कालावधीत येणा-या प्रत्येक रविवारी SUNDAY GARDEN हा उपक्रम साजरा करण्यासाठी स्थानिक कलाकार/ नागरिकांच्या कला गुणांना वाव देण्याच्या दृष्टीने तसेच उद्यानांमध्ये येणा-या नागरीकांचे मनोरंजन करण्याच्या दृष्टीने स्थानिक कलाकार/ नागरिकांनकडून त्यांची कला (उदा. गायन, नृत्य, चुटकुले सांगणे, जादुचे प्रयोग, मिमिक्री करणे वगेरे) सादर करण्यासाठी खुला मंच, Karaoke, माईक व स्पिकर यांची व्यवस्था करण्यात येईल. स्थानिक कलाकारांना/ नागरिकांना त्यांची कला विनामुल्य सादर करावी लागेल याची स्थानिक कलाकारांनी/ नागरिकांनी कृपया नोंद घ्यावी.

तरी SUNDAY GARDEN या नाविन्यपूर्ण उपक्रमात जास्तीत जास्त स्थानिक कलाकार/नागरिकांनी सहभाग घेऊन सदर उपक्रम यशस्वी करण्यासाठी महानगरपालिकेस सहकार्य करावे, ही विनंती.

(कल्पिता पिंपळे)
उप आयुक्त (उद्यान)
मिरा भाईंदर महानगरपालिका

Scanned with CamScanner